**<u>ठळक बातम्या</u>**

- जनसेवेच्या कार्यात युवकांनी उत्साहानं सहभागी व्हावं असं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी कार्यक्रमात आवाहन

- महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्रींना जयंतीनिमित्त देशाचं अभिवादन

- छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात १०३ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

- ज्येष्ठ गांधीवादी नेते जी जी पारीख यांचं निधन

**आणि**

- कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, वेस्ट इंडीजचा पहिला डाव १६२ धावात गुंडाळत, भारताच्या दिवसअखेर २ बाद १२१ धावा

**<><><><>**

जनसेवेच्या कार्यात युवकांनी मोठ्या उत्साहानं सहभागी व्हायला हवं. नैतिक मूल्यांवर आधारित राजकारणात सहभाग घेणं हे जनसेवेचं प्रभावी माध्यम असल्याचं प्रतिपादन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्त नागपूरात आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. २०४७ पर्यंतच्या विकसित भारतात संघांचं महत्त्वपूर्ण योगदान असेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड - रामनाथ कोविंद**

यावेळी त्यांनी देश तसंच संघाच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या व्यक्तींचं स्मरण केलं. सरसंघचालक मोहन भागवत यांनी यावेळी संघाच्या १०० वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, शिस्त आणि संविधानाचं पालन या पंचसूत्रीचा अधिकाधिक अवलंब करण्याचं आवाहन त्यांनी केलं. आत्मनिर्भर भारत निर्माण करताना देशाच्या गरजेनुसारच इतर राष्ट्रांवर अवलंबून रहावं, असंही ते यावेळी म्हणाले.

***होल्ड - सरसंघचालक***

भाषा, प्रांत आणि जात या मुद्द्यावरुन भेदभाव निर्माण करणाऱ्यांपासून सावध राहण्याचं आवाहन त्यांनी केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह विविध मान्यवर, स्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात सरसंघचालकांनी केलेल्या भाषणाचा संदर्भ देत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गौरव केला आहे.

**<><><>**

अश्विन शुद्ध दशमी - विजयादशमी अर्थात दसऱ्याचा सण आज सर्वत्र पारंपरिक पद्धतीनं साजरा होत आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह इतर मान्यवरांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. न्याय, समानता आणि सौहार्दाच्या विचारांनी प्रेरित होऊन एकत्र मार्गक्रमण करणारा समाज आणि देश निर्माण करण्यासाठी दसरा प्रेरित करेल, असं राष्ट्रपती म्हणाल्या. दसऱ्यानिमित्त सर्वांना साहस, बुद्धी आणि भक्तीमार्गावर निरंतर अग्रेसर राहण्याची प्रेरणा मिळावी असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

राज्यातल्या पुराच्या संकटसमयी सर्वांनी आपद्ग्रस्त नागरिकांच्या पाठीशी उभं रहावं आणि त्यांना धीर द्यावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दसऱ्याच्या शुभेच्छा देताना केलं आहे.

**<><><>**

दसऱ्यानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा मुंबईत शिवाजी पार्क इथं सुरू आहे. मेळाव्याला संबोधित करताना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं. राज्यातल्या शेतकऱ्यांची अवस्था भीषण आहे. हे संकट फार मोठं आहे. महाविकास आघाडीचं सरकार असताना ओला दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी करणारे मुख्यमंत्री आता ओला दुष्काळ नावाची संकल्पना नसल्याचं सांगत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

शिवसेनेचा दसरा मेळावा मुंबईत गोरेगाव इथं नेस्को मैदानावर होत आहे. दसरा मेळावा हे शक्तिप्रदर्शन नसून शेतकऱ्यांची सेवा असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

**<><><>**

६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येनं दाखल झाले आहेत. यानिमित्त आज सकाळी विशेष बुद्ध वंदना झाली. यावेळी परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी अनुयायांसोबत बुद्ध वंदनेत सहभाग घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा देखील भन्ते ससाई यांच्यासोबत अनुयायांनी ग्रहण केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज नागपुरात कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पलमधल्या बुद्ध वंदनेत सहभागी झाले होते.

दीक्षाभूमीपासून सुरू झालेल्या संविधान सत्याग्रह पदयात्रेची आज सेवाग्राममध्ये सांगता झाली.

**<><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५६व्या जयंतीनिमित्त, तसंच देशाचे दुसरे प्रधानमंत्री लालबहादुरशास्त्री यांच्या जंयतीनिमित्त देश त्यांना अभिवादन करीत आहे. नवी दिल्लीत राजघाट इथं महात्मा गांधींच्या समाधीस्थळी सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी राजघाट इथं पुष्पांजली अर्पण केली. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आहे. याखेरीज अनेक राजकीय नेते आणि विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी गांधीजयंतीनिमित्त अभिवादन केलं आहे.

जीएसटी बचत उत्सवाअंतर्गत खादीवर २० टक्के आणि ग्रामोद्याोग उत्पादनांवर १० टक्के सूट मिळणार आहे. ही सवलत येत्या ५ नोव्हेंबरपर्यंत मिळेल.

राज्यातही विविध ठिकाणी महात्मा गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांना आदरांजली वाहण्यात आली.

देशभरात आणि परदेशातल्या भारतीय दूतावासांमधे त्यानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत.

**<><><><>**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात आज १०३ माओवाद्यांनी सुरक्षा दलांपुढं आत्मसमर्पण केलं. त्यात २३ महिलांचा समावेश आहे. यापैकी ४९ माओवाद्यांवर एकूण १ कोटी सहा लाख रूपयांचं बक्षिस होतं. हे सर्वजण अनेक वर्षांपासून विविध माओवादी गटांसोबत काम करत होते. छत्तीसगड राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार या सर्वांना प्रत्येकी प्रोत्साहनपर ५० हजार रुपये दिले जातील. बिजापूर जिल्ह्यात या वर्षात आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांची संख्या आता ४ हजार १० झाली आहे. त्याशिवाय ४२१ जणांना अटक करण्यात आली. तर १३७ माओवादी वेगवेगळ्या चकमकींमध्ये मारले गेलेत.

<><><><>

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी नेते जी जी पारीख यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते १०१ वर्षांचे होते. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील १९४२ च्या चले जाव चळवळीत जी जी पारीख यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर आणीबाणीविरोधी आंदोलनातही पारीख यांना कारावास झाला होता. युसूफ मेहरअली सेंटरच्या माध्यमातून ते सामाजिक कार्यात शेवटपर्यंत सक्रिय होते.

<><><><>

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या बनारस घराण्याचे ख्यातनाम गायक पंडित छन्नूलाल मिश्रा यांचं आज पहाटे उत्तरप्रदेशात मिर्झापूर इथं निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. खयाल गायकीबरोबरच ठुमरी, भजन, कजरी आणि चैती गायनासाठी ते प्रसिद्ध होते. पद्मभूषण, पद्मविभूषण, संगीत नाटक अकादमीसह अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते.

<><><><>

भारत-वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं आज पहिल्याच दिवशी वेस्ट इंडीजचा पहिला डाव १६२ धावात गुंडाळला, आणि दिवसअखेर २ गडी गमावून १२१ धावा केल्या..

अहमदाबादमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात वेस्ट इंडिज नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र त्यांचे फलंदाज चांगली कामगिरी करु शकले नाहीत. सामन्यातले ३५ चेंडू बाकी असताना १६२ धावांवर त्यांचा डाव आटोपला. भारतातर्फे मोहंमद सिराजनं ४, जसप्रीत बुमराह ३, कुलदीप यादव २, तर वॉशिंग्टन सुंदरनं १ गडी

बाद केला. त्यानंतर फलंदाजी करताना भारताचा सलामीचा फलंदाज यशस्वी जयस्वाल ३६ धावा करुन बाद झाला. साई सुदर्शन ७ धावा करुन तंबूत परतला. के एल राहुलनं मात्र दमदार फलंदाजी करत अर्धशतक पूर्ण केलं. आजचा खेळ थांबला तेव्हा तो ५३ धावांवर, तर शुभमन गिल १८ धावांवर खेळत होता.

**<><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आपण सरकारच्या विविध क्षेत्रातील कामगिरीविषयी जाणून घेत असतो. आज आपण जाणून घेणार आहोत देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भातल्या वचनबद्धतेविषयी....

- **- व्हीसी - - -**

*(भारताची प्रतिमा आज जागतिक स्तरावर एक सशक्त, आत्मनिर्भर देश म्हणून झाली आहे. ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लोकसभेत म्हणाले होते…..*

- **- - होल्ड बाईट मोदी - - -**

*पहलगाम हल्ल्याला प्रत्यूत्तर देण्यासाठी भारतानं ६ आणि ७ मे ला ऑपरेशन सिंदूर राबवलं. यात पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, भारतीय लष्कराचं सामर्थ्य आणि तंत्रज्ञानाची क्षमता दिसून आली. हवाई संरक्षण यंत्रणा आणि ब्राह्मोस क्षेपणास्त्रानं तसंच ड्रोननं ऑपरेशन सिंदूरमधे सर्वोत्तम कामगिरी केली. ऑपरेशन सिंदूरमधून भारताचं लष्करी सामर्थ्यच नव्हे तर तंत्रज्ञानाची शक्ती आणि न्यायाचं नवं रुपही दिसलं. ….. ऑपरेशन सिंदूर अजून संपलं नाही, पाकिस्तानने कोणतीही आगळीक केली तर भारत चोख प्रत्यूत्तर देईल, असा इशारा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देऊन ठेवला आहे.)*

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने पर्यटन क्षेत्रात केलेल्या जीएसटी सुधारणांमुळे आता पर्यटनाला चालना मिळू शकणार आहे. साडे सात हजार रुपये प्रतिदिनापेक्षा कमी भाडं असणाऱ्या हॉटेलवरच्या जीएसटीत १२ टक्क्यांवरून ५ टक्के इतकी कपात करण्यात आली आहे. यामुळे परवडणाऱ्या दरात उत्तम हॉटेल सेवा मिळू शकणार आहे.

**<><><><>**